Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 772 – 774
DOI: 10.5281/zenodo.10279705

Original Research Article

# महात्मा गांधीजींची सत्याग्रह संकल्पना

डॉ. सौ. कुलकर्णी एस. एन.

विभागप्रमुख, तत्वज्ञान विभाग, शारदा महाविद्यालय, परभणी ४३१४०१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: swatikulkarni303@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

सत्याग्रह संकल्पना ही गांधीजींची विश्वविचाराला दिलेली देणगी आहे. सत्याग्रहाला गांधीजीच्या विचारसरणीत व स्वातंत्र्य अंदोलनाच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे. सत्याग्रह हा अनेकविध गुंतागुतीच्या समस्या सोडवण्याचा एक मार्ग आहे. अहिंसेवर, प्रेमावर, आत्मक्लेशावर त्याची उभारणी झालेली आहे म्हणून सत्याग्रही आपल्या प्रतिस्पर्ध्याबद्दल आपल्या मनात नेहमी आदरभाव व प्रेम बाळगतो. म. गांधीजीच्या मते सत्याग्रह हा प्रत्यक्ष कृतीचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. इतर सर्व मार्ग संपल्यावर या मार्गाचा आवलंबन करावा. दुराचाराचाही मुकाबला सदाचाराने करावा. हे गांधीजीच्या विचाराचे सुत्र आहे. जगातील अनेक राष्ट्रात भिन्न समस्या सोडवण्यासाठी व अन्याय निवारण्यासाठी सत्याग्रहाचा अवलंब केला पाहीजे. गांधीजीने सत्याग्रहाचे वर्णन अनेकदा 'शांततामय बंड' असे केले आहे. तसेच सत्याग्रहात वैयक्तिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय समस्या सोडविण्याची सुप्त शक्ती असते. सत्याग्रहाद्वारे कोणत्याही प्रकारचे मतभेद व तंटे मिटविता येतात म्हणून महात्मा गांधीनी सत्याग्रह म्हणजे समस्या व प्रश्न सोडविण्याची गुरूकिल्ली आहे असे सत्याग्रहाचे वर्णन केले आहे. या संदर्भात ते म्हणतात. "सत्याग्रह ही गुरूकिल्ली आहे कारागिर आपल्या कामाची एक प्रकारची किल्ली बनवितात ती सर्व प्रकारच्या कुलपांना चालते ते तिला 'मास्टर की' म्हणतात. तसेच 'सत्याग्रह' ही आपल्या अगणित आपत्तीवरील गुरूकिल्ली आहे."[1]

## सत्याग्रहाचा अर्थ

सत्याग्रह हा संस्कृत शब्द आहे. हा शब्द सत्य आणि आग्रह या दोन शब्दापासून बनला आहे म्हणून सत्याग्रहाचा शब्दश: अर्थ सत्याचा आग्रह असा आहे तसेच सत्य आणि अहिंसेच्या साहाय्याने दुष्ट प्रवृत्तीशी मुकाबला करणे म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रहाच्या या प्रयोगात प्रतिपक्षावर हिंसेचा प्रयोग करता येत नाही सत्यग्रहात प्रतिपक्षाचे मन व अंत: करण बदलण्यावर भर दयावा लागतो. राजकीय श्रेत्रात सतत होणारे अन्याय, जूलूम व शोषण या विरूध्द लढा देण्यासाठी 'सत्याग्रह' हे एक प्रभावी साधन आहे असे गांधीजी म्हणत. त्याचप्रमाणे सत्याग्रह म्हणजे आत्मिक शक्तीच्या जोरावर अन्याय व पिळवणूकीच्या विरोधात केलेला प्रतिकार व प्रत्यक्ष कृती होय. स्वत: कष्ट सहन करून सत्याचे रक्षण करणे म्हणजे सत्याग्रह असे ते लिहतात.

गांधीजी म्हणत सत्याचा आग्रह धरीत असताना सत्यबंधन आणि समाजबंधनाचा त्याग करीत नाहीत तर अशा बंधनात राहूनच सत्याचा आग्रह धरावा. सत्याग्रहीने सत्याग्रहाचा अवलंब सार्वजनिक जीवणात करण्यापूर्वी त्याने आत्मिकशक्ती प्राप्त केली पाहीजे. सत्याग्रही व्यक्तीच्या अंगी अनेक प्रकारचे सत्याग्रहा संबंधीचे जे नियम आहेत त्याचेही पालन सत्याग्रही व्यक्तीने केले पाहीजे. गांधीजीच्या मते सत्याग्रह ही अत्यंतर खडतर व कठीण साधना आहे. त्यासाठी शरीराची व मनाची फार मोठी उडी सत्याग्रहीला गाठावी लागते. सत्याग्रहासाठी विविध मार्गाचा अवलंब करावा लागतो. ती मार्ग पूढीलप्रमाणे दिसून येतात.

**१. असहकार**

असहकाराच्या मार्गाचा अवलंब करून शासनाच्या विरोधी काम करता येते व शासनाचे मन वळवता येते अशी गांधीजीची धारणा होती. १९१९ – २२ च्या दरम्यान आणि १९४३ च्या अंदोलनात गांधीजीने असहकाराचे अंदोलन यशस्वीपणे चालविले. असहकाराच्या अंदोलनात गांधीजीनी विदेशी वस्तूवर बहिष्कार, न्यायालयावर बहिष्कार, सरकारने दिलेली पदे-पदव्या यांचा त्याग करने, स्थानिक स्वराज्य संस्था व कायदेमंडळावर बहिष्कार, ब्रिटीशप्रणीत शाळा- कॉलेजवर बहिष्कार इ. मार्गाचा अवलंब केला. परंतु असहकाराचे आंदोलन जेव्हा पूर्णत्वाला पोहचले तेव्हा त्याला अचानक हिंसक वळण लागल्याने हे अंदोलन थांबवावे लागले.

नॅस म्हणतात. 'गांधींना अपेक्षित असहकार म्हणजे पापाशी दुष्टतेशी असहकार होय.' असहकाराच्या साहाय्याने मानवामानवातील संबंधावर अथवा परस्परांवर मर्यादा घालणे, हा चूकीचा मार्ग होय. तो असहकार होऊ शक्त नाही म्हणजे असहकाराला सूद्धा नैतिक अधिष्ठाण असावे असे गांधींना वाटे.

**२. सविनय कायेदेभंग**

भारताच्या राजकीय चळवळीला जेव्हा हिंसक वळण मिळणार असे दिसू लागले. तेव्हा ते टाळण्यासाठी गांधीजीनी १९३० मध्ये सविनय कायदेभंगाची घोषणा केली. १२ मार्च १९३० रोजी ते साबरमती आश्रामातून स्वराज्य मिळाल्याशिवाय परत परत येणार नाही अशी प्रतिज्ञा करून समुद्रकिनाऱ्या वरील दांडीकडे मिठाचा कायदा तोडण्या करिता ७२ सत्याग्रही वीरांसह गेले. सविनय कायदेभंग करणारा कधी शस्त्रास्त्रांचा वापर करीत नाही. सभ्यता, संयम, विवेक, अहिंसा हे चार गूण नसलेला कायदेभंग म्हणजे निश्चित नाशच होय असे गांधीजी म्हणत. सविनय कायदेभंग म्हणजे शांततापूर्वक केलेले बंड होय. सविनय कायदेभंग म्हणजे अराजक नव्हे. उदा. गांधीजीनी १९३० च्या सविनय कायदेभंग चळवळीमध्ये कोणत्याही हिंसात्मक मार्गाचा अवलंब न करता चळवळ यशस्वी करून दाखवली.

**३. हरताळ**

सरकारचा निषेध म्हणून कामकाज बंद ठेवावे जेणेकरून सरकार आपल्याकडे लक्ष देईल. आपल्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करेल. मात्र हरताळमध्ये हिंसेला स्थान देऊ नये. हरताळाचे स्वरूप ऐच्छिक असावे. हरताळात सम्मीलित होणाऱ्या व्यक्तीला काही दस्तकलेचे ज्ञान असावे ज्यामुळे हरताळाच्या काळात त्यांना आपली उपजीविका चालविता येईल. सत्ता मिळविण्यासाठी व स्वार्थी हेतूसाठी हरताळाचा वापर करू नये. समाजातील सर्व वर्गाने ठराविक वेळी कामकाज बंद करून व्यवस्थेला विरोध करावा. परंतु वारंवार यामार्गाचा अवलंब करता कामा नये. हरताळ हा मार्ग अतिशय विचारपूर्वक वापरावा असे गांधींजी म्हणत.

**४. उपोषण**

उपोषणाचा शुद्ध हेतू वेगवेगळया धर्मात आत्मशुद्धी असा सांगितलेला आहे परंतु महात्मा गांधींनी असहकार व सविनय कायदेभंग याप्रमाणेच उपोषण या मार्गाचा वापर राजकीय उद्दीष्टांचा पूर्तीसाठी वारंवार केला होता. उपोषण हे अन्याय व अनीती यांच्या विरूध्द निषेध नोंदविण्याचे प्रभावी साधन आहे.

गांधीजींच्या मते " उपवास हे एक जाज्वल्य शास्त्र आहे. उपवास ही एक आध्यात्मि क उपाययोजना असते आणि म्हणून ती ईश्वराभिमूख असते उपवासामूळे अन्याय करणाऱ्या व्यक्तीमधील सद्‌वृत्तीला अहवान केले जाते." [2] पण उपवासाच्या काही मर्यादा असतात असेही ते म्हणतात. स्वत: गांधीनी दीर्घकाळ उपोषणे केले किंबहुना गांधीचा उपवासहे एक यशस्वी राजकीय शस्त्र होते.

**५. बहिष्कार**

जे लोक असहकारात भाग घेत नाहीत जे समाजाच्या हितासाठी प्रयत्न करत नाहीत, उलट विरोध करणे हेच त्यांचे काम असते अशा समाजातील दुष्टप्रवृत्तीला नष्ट करण्यासाठी बहिष्काराचा अवलंब करावा असे गांधीजी सूचवतात. गांधीजींच्या आदेशावरून १९२० व १९३० साली भारतीय जनतेने शासकीय कचेऱ्या, शाळा-महाविद्यालये, न्यायालये, शासकीय कार्यक्रम, कायदेमंडळ,विदेशी वस्त्र इ. वर बहिष्कार टाकला होता. पण हे सर्व करत असताना काही नियम पाळले जावेत असेही गांधीजीनी म्हटले आहे.

**६. हिजरत (देशत्याग)**

हिजरत या उर्दू शब्दाचा अर्थ म्हणजे स्वेच्छेने देहत्याग करणे. महंमद पैगंबराने ज्याप्रमाणे मक्केतून मदिनेला स्थानांतर केले होते त्यालाच 'हिजरत' म्हणतात. जेव्हा एखादा व्यक्ती किंवा व्यक्तीसमूहावर अन्याय होतो त्यांना अत्यंत हाल आपेष्टा भोगाव्या लागतात जेव्हा त्यांच्या प्रतिकाराचे सर्व मार्ग बंद होतात तेव्हा गांधीजी त्यांना हिजरतचा सल्ला देतात. कारण त्याशिवाय दुसरा पर्यायच नसतो.

गुजरातमधील बार्डोली ( गुजरात ) येथील शेतकऱ्यांना व कोठा येथील हरिजन यांना गांधीजींनी हाच सल्ला दिला की, अन्यायग्रस्तांनी हिजरतचा मार्ग अवलंबावा.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, सत्याग्रह ही महात्मा गांधीनी केवळ भारतीयांनाच नव्हे तर संपूर्ण मानव जातीला दिलेली देणगी आहे. सत्याग्रह हे लोकांचे सहकार्य मिळणयाचे प्रभावी माध्यम आहे एवढेच नाहीतर सत्याग्रह स्वराज्याचे संरक्षण करणारे रखवालदार आहे. यामुळे सत्याग्रहाचा आशय नीट समजून घेऊन बदलत्या काळात त्याला नवीन आयाम देऊन त्याचा वापर केल्यास सत्याग्रह अन्याय निवरणाचे शस्त्र म्हणून फार उपयुक्त आहे.

**संदर्भ ग्रंथ**

१. भारतीय राजकीय विचार – प्रा. किसण चोपडे – पृष्ठ क्र. १२२

२. आधुनिक राजकीय विचारवंत – डॉ. साहेबराव गठाळ – पृष्ठ क्र. २३५

३. परामर्ष (तत्वज्ञान विभाग , पुणे विद्यापीठ) – नागोराव कुंभार खंड २७ - २ ऑगस्ट – आक्टोबर २००५

**आधार ग्रंथ**

१. भारतीय राजकीय विचारवंत – डॉ . व्हि . जी कुलकर्णी, प्राकांत सोमवैशी

२. शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र – अ. बा. कुंडले.